


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
# मराठवाडा पत्र
संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक ३१२ ●गुरूवार,दि.१२ फेब्रुवारी २०२६ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये
● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

# धनंजय मुंडेंच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यास मोठे यश

- संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजनेतून बीड जिल्ह्यात आणखी ११ वसतिगृहे उभारणीस शासनाकडून १५९.३६ कोटी रुपये निधी उपलब्ध!
- ऊसतोड कामगारांच्या मुला – मुलींना दर्जेदार शिक्षणाची वाट मोकळी
- स्व. अजितदादांनी बीड येथील ऊसतोड कामगार मेळाव्यात धनंजय मुंडेना दिला होता शब्द!



मुंबई । प्रतिनिधी

लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या अंतर्गत तत्कालीन सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे यांनी सुरू केलेल्या संत भगवान बाबा शासकीय वसतीगृह योजनेला व्यापक स्वरूप प्राप्त होत असून धनंजय मुंडे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश आले आहे. धनंजय मुंडे यांनी सामाजिक न्याय मंत्री असताना २५ जून, २०२१ रोजी या योजनेची घोषणा करून प्रत्यक्षात अंमलबजावणी सुरू केली होती. त्यामुळे मुंडे जनक असलेल्या संत भगवान ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● अजितदादांचा शब्द अन् मुंडेंची कृतज्ञता

काही दिवसांपूर्वी बीड जिल्हा दौऱ्यावर असताना तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री दिवंगत नेते स्वर्गीय अजितदादा पवार यांनी बीड येथे आयोजित एका ऊसतोड कामगारांच्या मेळाव्यामध्ये धनंजय मुंडे यांनी आजपर्यंत ऊसतोड कामगारांसाठी केलेल्या कामाचे कौतुक करतानाच संत भगवान बाबा शासकीय वसतीगृह योजनेतून सर्व ११ तालुक्यांमध्ये बावीस वसतीगृह ही स्वतःच्या जागेत उभारून देऊ व त्यासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही असा शब्द दिला होता, तो शब्द आता पूर्णत्वाकडे जात असून धनंजय मुंडे यांनी स्व. अजितदादा पवार यांची आठवण काढत त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र भाऊ फडणवीस, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांचेही आभार व्यक्त केले आहेत.

# बीड न.प. स्थायी समिती बैठकीत डॉ.सारिका क्षीरसागरांनी मांडला शहर विकासाचा रोडमॅप

- विकास आराखड्यासंदर्भात अनेक प्रस्ताव केले सादर
- मूलभूत सुविधांसह शहरवासीयांच्या जिव्हाळ्याचे मांडले प्रश्न

बीड । प्रतिनिधी

बीड नगरपरिषदेच्या स्थायी समितीची पहिली बैठक बुधवारी (दि.११) पार पडली असून या बैठकीत शहराच्या सर्वांगीण विकासासंबंधी विविध महत्त्वाचे मुद्दे चर्चेला आले. भाजपच्या गटनेत्या व स्थायी समिती सदस्या डॉ.सारिकाताई योगेश क्षीरसागर यांनी बीड शहरवासीयांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांसह भविष्यातील विकास आराखड्यासंदर्भात अनेक प्रस्ताव सभागृहासमोर मांडले.

नगराध्यक्ष प्रेमलता पारवे, समिती सभापती, सदस्यांच्या उपस्थितीत बैठक झाली. या बैठकीत डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी जिल्हा वार्षिक योजना २०२६-२०२७ अंतर्गत शहरातील विविध भागांमध्ये रस्ते व नाली बांधकामासाठी कामांची नावे सुचवली तसेच नगरपरिषद इमारतीवर सौरऊर्जा प्रकल्प बसवणे आणि हद्दवाढ भागात ५०० नवीन विद्युत खांब उभारण्यासाठी विद्युत मंडळाकडे प्रस्ताव पाठवण्याची मागणी केली. पाणी पुरवठा सुधारण्यासाठी धानोरा रोड मार्गे अमृतअटल योजना २.० अंतर्गत नवीन पाणीपुरवठा योजना प्रस्तावित ▶▶ उर्वरित पान २ वर



### ● डॉ.सारिका क्षीरसागर बनल्या बीडकरांचा आवाज

स्थायी समितीच्या पहिल्याच बैठकीत शहराच्या सर्वांगीण विकासासाठी विविध विभागनिहाय मांडण्यात आलेल्या प्रस्तावांमुळे आगामी काळात बीड शहराच्या विकासाला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तसेच, डॉ.सारिका क्षीरसागर या सातत्याने शहरवासीयांच्या समस्यांवर आवाज उठवत असून प्रत्यक्ष क्षेत्रात जाऊन प्रश्न सोडवित आहेत. यावरून त्या बीडकरांचा आवाज बनल्याचे चित्र दिसून येत आहे.

# अपहरण मुलीच्या पीडित कुटुंबाला पोलिसांकडून मारहाण अधीक्षकांचे चौकशीचे आदेश

## पीडित कुटुंबाविरोधात पोलिसांकडून गुन्हा दाखल

बीड । प्रतिनिधी

धावज्याची वाडी येथील अल्पवयीन मुलीच अपहरण केल्याची घटना दोन महिन्यापूर्वी घडली होती. या प्रकरणात तक्रारदाराच्या नातेवाईकांना मारहाण करून गुन्हे दाखल करण्याचा प्रकार नेकनूर पोलिसांनी केला. याचा व्हिडिओ समाज माध्यमावर व्हायरल झाला होता. या प्रकरणात पोलिसांनी सात जणांसह इतर अज्ञात इसमावर गुन्हे दाखल केले आहेत. या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश पोलीस अधीक्षकांनी दिले आहेत. याबाबत अधिक माहिती अशी




की, धावज्याची वाडी येथील अल्पवयीन मुलगी एक डिसेंबर २०२५ पासून गायब आहे. या प्रकरणात नातेवाईकांनी तक्रारही दाखल करून दोन महिन्याहून अधिक काळ उलटला आहे. मुलीच्या वडिलांनी संशयितांची नाव देखील सांगितली आहेत. मात्र पोलिसांच्या हाती अजून काहीच लागले नाही. पीडित कुटुंबाने पोलीस ठाण्यात ठिय्या दिला. ठाण्याचे उंबरे झिजवले मात्र पोलिसांनी समाधानकारक उत्तर कधीच दिले नाही. दरम्यान मंगळवारी पीडित कुटुंब नातेवाईकांसोबत पोलीस ठाण्यात आले असता नातेवाईकांना पोलिसांनी मारहाण केली. पोलीस ठाण्यात बसवून ठेवले. वार्तांकन करण्यासाठी आलेल्या पत्रकाराला ही दमदाटी करण्यात आली. एवढ्यावरच हे प्रकरण थांबलं नाही तर गुन्हे देखील दाखल करण्यात आले. मात्र पोलिसांनी दाखल केलेल्या एफ आय आर मध्ये संशयित आरोपीचे नातेवाईक रुक्मिण पांडुरंग चोबे, ▶▶ उर्वरित पान २ वर

# कोयत्याचा धाक दाखवला; टोळीतील ट्रॅक्टर चालकाने बालिकेवर दोन वेळा अत्याचार केला



केज । प्रतिनिधी

ऊस तोडणीच्या कामासाठी परभणी जिल्ह्यातून आलेल्या ऊसतोड मजुराच्या तेरा वर्षीय मुलीवर टोळीतील ट्रॅक्टर चालकाने कोयत्याचा धाक दाखवून दोन वेळेला बलात्कार केल्याची घटना घडली आहे.युसूफवडगाव पोलीस ठाण्यात 'पोक्सो' अंतर्गत याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अधिक असे की, सूरज अशोक खरात रा. जामरून, ता. जिंतूर, जि. परभणी हा त्याच टोळीत ट्रॅक्टर चालक म्हणून काम करतो. १४ जानेवारी रोजी दुपारी १२ च्या सुमारास सुर्डी शिवारातील एका कोपीत तेरा वर्षीय मुलीला एकटे गाठून सुरज खरात ने कोयत्याचा धाक दाखवत अत्याचार केला. एवढ्यावरच तो न थांबता ८ फेब्रुवारी रोजी सकाळी पुन्हा हादगाव शिवारात त्याने पीडितेवर बळजबरी केली. जिवे मारण्याची धमकी दिल्याने घाबरलेल्या चिमुकलीने अखेर आपल्या आईला हा प्रकार सांगितला.पीडित बालिकेच्या आईने हिंमत दाखवत मंगळवारी रात्री उशिरा युसूफवडगाव पोलिसात धाव घेऊन तक्रार दिली. ▶▶ उर्वरित पान २ वर

# आज भारत बंदची हाक!! काय बंद, काय सुरु राहणार?

नवी दिल्ली

देशभारतील कामगार संघटना, बँक कर्मचारी आणि शेतकरी संघटनांनी भारत बंदची हाक दिली आहे. आज१२ फेब्रुवारी रोजी बंद पाळण्यात येणार आहे.

संपात ३० कोटींहून अधिक कामगार सहभागी होऊ शकतात असा कामगार संघटना नेत्यांचा दावा आहे. परिणामी, उद्या अनेक राज्यांमध्ये बँकिंग सेवा, सार्वजनिक वाहतूक, सरकारी कार्यालये आणि औद्योगिक कामकाजावर मोठा परिणाम होऊ शकतो. याच पार्श्वभूमीवर उद्या कोणकोणत्या सेवा या बंद राहतील आणि कोणत्या सुविधांना मुभा देण्यात आली




आहे ते आपण जाणून घेऊया.

उद्याची भारत बंदची हाक हि नवीन लेबर कोड आणि भारत-अमेरिकेतली व्यापारी कराराविरोधात आहे. या नवीन बदलांमुळे देशाच्या कामगार वर्ग, अर्थव्यवस्था आणि सामान्य नागरिकांवर मोठा परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सरकारच्या नवीन धोरणांचा या संघटनांनी विरोध केला आहे. भारत बंदमध्ये १० केंद्रीय ट्रेड युनियनचा समावेश आहे. यामध्ये INTUC, -ITUC, HMS, CITU, AIUTUC, TUCC, SEWA, AICCTU, LPF आणि UTUC यांचा समावेश आहे. कामगार संघटनांचे म्हणणे आहे की हे कायदे कंपन्यांना अधिक फायदे देत असून कामगार संरक्षण कमी करतील. शेतकरी संघटनांनीही या चळवळीला पाठिंबा दर्शविला आहे.

**१२ फेब्रुवारी रोजी भारत बंद असला तरी काही जीवनावश्यक सेवा सुरूच राहतील. रुग्णालये आणि आपत्कालीन सेवा, रुग्णवाहिका सेवा, वैद्यकीय मेडिकल, एटीएम, अग्निशमन दल आणि मदत सेवा, दूध पुरवठा, वर्तमानपत्र वितरण, विमानसेवा सुरूच राहणार आहेत .**

१२ फेब्रुवारी २०२६ रोजी सार्वजनिक क्षेत्रातील बँका काही भागात बंद राहू शकतात किंवा मर्यादित कर्मचाऱ्यांसह काम करू शकतात.

सरकारी कार्यालये आणि सार्वजनिक उपक्रमांमध्ये उपस्थिती कमी असू शकते.

बस, टॅक्सी आणि इतर सार्वजनिक वाहतूक सेवा कमी वेगाने चालू शकतात किंवा काही भागात बंद राहतील.

कारखाने आणि औद्योगिक युनिट्स एका दिवसासाठी कामकाज थांबवू शकतात.

ज्या भागात संप सर्वात प्रभावी आहे तेथे शाळा आणि महाविद्यालये बंद राहू शकतात.

अनेक शहरांमध्ये बाजारपेठा आणि स्थानिक दुकाने देखील बंद राहू शकतात.

# पोलीस भरतीसाठी आलेल्या तरुणाचा दुर्दैवी मृत्यू



बीड । प्रतिनिधी

येथे १७४ पदांसाठी पोलीस भरती प्रक्रिया सुरू आहे. सोळाशे मीटर धावण्याच्या चाचणी दरम्यान बुधवारी (दि.११) दुपारी एका तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. दीपक भास्कर वाव्हळ रा. मांडेखेल.ता. परळी असे मृत तरुणाचे नाव आहे. तो मूळचा मांडेखेल येथील रहिवासी आहे. दीपक ▶▶ उर्वरित पान २ वर

# अतिवृष्टी नुकसानीच्या आपत्तीपश्चात गरजांचे मूल्यांकनासाठी केंद्रीय पथकाचा बीड जिल्हा दौरा

बीड । प्रतिनिधी

अतिवृष्टीमुळे २०२५ च्या पावसाळ्यात राज्यातील विविध जिल्ह्यांत झालेल्या नुकसानीचा सविस्तर आढावा घेण्यासाठी पोस्ट डिसास्टर नीड्स अस्सेसमेंट आपत्तीपश्चात गरजांचे मूल्यांकनपथक राज्यात दाखल झाले आहे . या पार्श्वभूमीवर केंद्राच्या राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणातील तज्ज्ञांचे पथक बीडसह मराठवाड्यातील प्रभावित जिल्ह्यांना भेट देत आहेत . पथकात पुढील अधिकारी आहेत . श्री. एम. विनोथ , सौ. वंदना श्रीवास्तव , श्री. सुहास मोहंती , श्री. रोहित कुमार व सौ. वैशाली मस्के . राज्याच्या महसूल व वन विभाग, मदत व पुनर्वसन विभागाने ९ फेब्रुवारी २०२६ रोजी यासंदर्भात पत्र



जारी केले असून, या पथकाचा दौरा १० ते १३ फेब्रुवारीदरम्यान आयोजित करण्यात आला आहे . पावसाळ्यात झालेल्या हानी-नुकसानीचा सखोल अभ्यास करून त्याचा अहवाल केंद्र सरकारकडे सादर केला जाणार आहे. या अहवालाच्या आधारे राज्याला केंद्राकडून भरपाई निधी मिळण्यास मदत होणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे . या पथकाचे दोन उपगट करण्यात आले आहेत. यापैकी एक उपगट सोलापूर व धाराशिव जिल्ह्यांची पाहणी करणार असून दुसरा उपगट छत्रपती संभाजीनगर, बीड व अहिल्यानगर या जिल्ह्यांना भेट देणार आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सूचित केल्यानुसार व निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार ▶▶ उर्वरित पान २ वर

# छत्रपती संभाजीनगरमध्ये सामूहिक कॉपीचा धक्कादायक प्रकार

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

संभाजीनगरच्या कन्नड तालुक्यात बारावीच्या परीक्षा केंद्रात सामूहिक कॉपीचा प्रकार समोर आला. आश्चर्याची बाब म्हणजे एकाच बेंचवर दोन विद्यार्थी बसून परीक्षा देत होते. या केंद्रात पर्यवेक्षकांसह इतर शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनीच परीक्षार्थींना इंग्रजीच्या पेपरसाठी प्रश्नांची उत्तरं पुरवली. दरम्यान शिक्षणाधिका-यांचं ▶▶ उर्वरित पान २ वर



# ग्लुकोमा 'हा' निव्वळ वृध्दापकाळातील विकार नव्हे तर तरुणांमध्ये वाढतोय डोळ्यांचा आजार




ग्लुकोमा अर्थात काचबिंदू म्हणजे नेमकं काय? ज्याप्रमाणे आपला रक्तदाब असतो, त्याचप्रमाणे आपल्या डोळ्यांवर विशिष्ट दाब असतो, ज्याला इंट्राऑक्युलर प्रेशर म्हणतात. नॉर्मल इंट्राऑक्युलर प्रेशर जवळपास १० ते २१ mmHg दरम्यान असते. जेव्हा हा दाब वाढतो तेव्हा आपल्या ऑप्टिक नर्व्ह म्हणजे डोळ्यांच्या मज्जातंतूवर दबाव पडतो. ज्यामुळे पेशी मृत होतात कार्य हळूहळू संथ होते. शेवटी दृष्टी कमी होते. दृष्टी कमी होण्याची प्रक्रिया वेदनारहित असते तसेच हा विकार शेवटच्या गंभीर टप्प्यापर्यंत पोहोचेपर्यंत त्या व्यक्तीला समजू शकत नाही. म्हणूनच याला डोळ्याचा 'सायलंट किलर' असेही म्हणतात.

मोतीबिंदूसारखाच ग्लुकोमा म्हणजेच काचबिंदू हा वृद्धापळात होणारा रोग आहे, असे पूर्वी म्हटले जायचे. मात्र हे १०० टक्के खरे नाही. काचबिंदू नवजात शिशूंमध्येही दिसून येतो; त्याची टक्केवारी खूप कमी असली तरी ती दिसून येते. लहान वयात, ग्लुकोमा होण्याची शक्यता देखील असते, विशेषतः ज्या लोकांमध्ये पुढील घटक आढळतात:

१) उच्च मायनस नंबर
२) उच्च प्लस नंबर
३) ग्लुकोमाचा कौटुंबिक इतिहास
४) मधुमेही व्यक्ती
५) इतर आजार असलेल्या व्यक्ती
६) ऑटोइम्युन विकारग्रस्त व्यक्ती
७) एखादा आघात झालेली व्यक्ती
८) जे स्टिरॉइड उपचार घेत असून बऱ्याचदा ॲलर्जीच्या स्थितीत असलेले

या सर्वांना कमी वयात ग्लुकोमाचा अधिक धोका असतो.

तुम्ही कोणती खबरदारी घेऊ शकता?

ग्लुकोमाचे निदान लवकर होणे खूप महत्वाचे आहे, हे आपल्याला ठाऊक आहे. आम्ही वरील सर्व जोखीम घटक असलेल्या व्यक्तिंना स्वतःच्या डोळ्यांची तपासणी नियमितपणे करण्याची शिफारस करतो. ज्यात इंट्राऑक्यूलर प्रेशर तसेच विशेषतः ऑप्टिक डिस्कच्या ओसीटी आणि पेरीमेट्री यासारख्या चाचण्यांचा समावेश आहे. जोखीम क्षेत्रात काही मापदंड आढळल्यास, डोळ्यांच्या डॉक्टरांशी सल्लामसलत तसेच नियमित पाठपुरावा करून, आपण ग्लुकोमा नियंत्रणात ठेवू शकतो. त्यामुळे शेवटी, ग्लुकोमा म्हणजे डोळ्याच्या सायलंट किलरचे लवकर निदान झाल्यास विकारग्रस्त व्यक्तिसाठी फायदेशीर असते. केवळ वृद्धांनाच नव्हे तर तरुणांनाही ग्लुकोमा होऊ शकतो. काही जोखीम घटक असल्यास त्यांची तपासणी करणे आवश्यक आहे, हे लक्षात असू द्या!

◆ पान १ वरून पुढे...

## धनंजय मुंडेंच्या...

बाबा शासकीय वसतीगृह योजनेच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील सर्व ११ तालुक्यांमध्ये शंभर क्षमतेचे मुलींसाठी एक व मुलांसाठी एक असे एकूण २२ वसतीगृह मंजूर करून भाड्याच्या जागेत सुरू करण्यात आलेले आहेत. दरम्यान त्यापैकी आतापर्यंत तीन वसतीगृहांना स्वतःची जागा व निधी मिळालेला असून त्याचे बांधकाम प्रगतिपथावर असून, उर्वरित १९ पैकी ११ वसतीगृहांसाठी जागेसह १५९ कोटी छत्तीस लाख रुपयांचा निधी राज्य शासनाने उपलब्ध करून दिला आहे. याबाबतचा शासन निर्णय सामाजिक न्याय विभागाच्या वतीने निर्गमित करण्यात आला आहे. ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या हातात भविष्यात कोयत्याच्या ऐवजी वही, पुस्तक आणि पेन यावेत असे स्वप्न उराशी बाळगून धनंजय मुंडे यांनी सामाजिक न्याय मंत्री असताना संत भगवान बाबा शासकीय वसतीगृह योजनेची घोषणा करत सुरुवात केली होती. त्या अंतर्गत ऊसतोड कामगारांची सर्वाधिक संख्या असलेल्या राज्यातील ४१ तालुक्यांमध्ये ८२ वसतीग्रह सुरू करण्याची घोषणा धनंजय मुंडे यांनी करून बीड जिल्ह्यातील सर्व ११ तालुक्यांमध्ये प्रत्येकी दोन याप्रमाणे २२ वसतीग्रहे भाड्याच्या जागेत सुरू केली होती. दरम्यान यापैकी तीन वसतीगृहे ही स्वतःच्या जागेमध्ये उभारण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला असून आता आणखी उर्वरित १९ पैकी ११ वसतीगृहांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. यामध्ये परळी सह पाटोदा, गेवराई, केज, माजलगाव या तालुक्यातील प्रत्येकी दोन तर बीड तालुक्यातील एक वसतीगृह उभारले जाणार आहे. तर प्रयत्न वसतिगृह उभारणीसाठी सुमारे १४ कोटी ५५ लाख रुपये इतका निधी खर्च केला जाणार आहे.

## बीड न.प. स्थायी....

करण्यासोबतच इदगाह पाण्याच्या टाकीजवळील गळती दुरुस्ती, हद्दवाढ भागात टँकरद्वारे पाणीपुरवठा, पाइपलाइन नसलेल्या ठिकाणी बोअरवेल घेणे व नगरपरिषद इमारतीवर रेनवॉटर हार्वेस्टिंगची व्यवस्था करण्याचा मुद्दा मांडण्यात आला. तीर्थक्षेत्र विकास योजनेंतर्गत कंकालेश्वर, खंडेश्वरी देवी, राममंदिर, कोरडे गणपती, सोमेश्वर, दक्षिणमुखी हनुमान व विश्वेश्वर मंदिरासह विविध धार्मिक स्थळांच्या विकासाचे प्रस्ताव ठेवण्यात आले. बांधकाम व नगररचना विभागांतर्गत शहरातील महत्त्वाचे रस्ते, डीपी रोड, पुलांची कामे मार्गी लावणे, नवीन डीपी रोड प्रस्तावित करणे तसेच गुंठेवारी प्रक्रिया सुरू करण्याबाबत चर्चा झाली. नागरी सुविधा मजबूत करण्यासाठी महिलांसाठी सार्वजनिक शौचालये, पुरुषांसाठी मुताऱ्या, नवीन स्मशानभूमी व कब्रस्थान, भाजी मंडई व फळ मार्केट उभारणे तसेच शहराच्या पश्चिम भागात नवीन अग्निशमन केंद्र उभारण्याची मागणी करण्यात आली. याशिवाय यशवंतराव चव्हाण उद्यानाचा विस्तार, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याची उंची वाढवून परिसर सुशोभिकरण, भिमसृष्टी येथे माता रमाई पुतळा उभारणी, छत्रपती संभाजी महाराज व उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांचे पुतळे उभारणे, बौद्ध विहार, चर्च, हज हाऊस उभारणी, फुलपाखरू उद्यान तयार करणे, शहरात ई-लायब्ररी सुरू करणे, बिंदुसरा व कर्परा नदी सुशोभिकरणासाठी डीपीआर तयार करून शासनाकडे पाठवणे तसेच तारांगण प्रकल्प सुरू करण्याचे प्रस्ताव मांडण्यात आले. नगरपरिषदेच्या मालकीच्या इमारतींच्या भाडे पुनर्रचनेद्वारे उत्पन्न वाढवण्याचा मुद्दा मांडण्यात आला. तर स्वच्छता विभागासाठी नवीन जेसीबी, कॉम्पॅक्टर, घंटागाड्या व ट्रॅक्टर खरेदी, प्लास्टिक मुक्ती अभियान, रस्त्यांच्या दुतर्फा वृक्ष लागवड व नवीन उद्याने विकसित करण्यावर भर देण्यात आला. हद्दवाढ भागात आरोग्य केंद्र प्रस्तावित करण्यासोबतच शहरातील अनाधिकृत बॅनर व होर्डिंगजवर कारवाई करण्याची मागणी डॉ. सारिका क्षीरसागर यांनी केली. यावेळी उपमुख्याधिकारी यांच्यासह सर्व विभागांचे प्रमुख अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## अपहरण मुलीच्या....

धर्मा रघुनाथ खिल्लारे या दोघांना चौकशीसाठी पोलीस ठाण्यात बोलावले होते. मात्र अपहरण झालेल्या मुलीचे पीडीत कुटुंब न बोलवता पोलीस ठाण्यात त्याच वेळेत हजर झाले. पीडित कुटुंबाला तपासाची माहिती देण्यात आली. दरम्यान फिर्यादीचे व आरोपीचे कुटुंब बाहेर पडत असताना एकमेकांना शिवीगाळ करू लागले. एकमेकांना मारहाण देखील करू लागले. हा प्रकार पोलिसांनी सोडवला. या प्रकारामुळे सामाजिक शांतता भंग झाली. पोलीस ठाणे परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले. परिणामी पोलिसांनी रुक्मीन पांडुरंग चोबे, कृष्णा गोविंद चोबे, पांडुरंग बाबासाहेब चौबे, धर्मा रघुनाथ खिल्लारे, बब्रुवान नवनाथ गायकवाड, गवळण बाई बब्रुवान गायकवाड, बिभीषण हरिदास भोसले व इतर अन्य यांच्या विरोधात पोलीस हवालदार सतीश राऊत यांच्या फिर्यादीवरून कलम १९४ (२) बीएनएस प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. दरम्यान या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांनी दिले आहेत. या प्रकरणाची चौकशी केजचे उपविभागीय अधिकारी करणार असून सीसीटीव्ही तपासले जाणार आहेत. या प्रकरणात पुढे काय होणार याकडे लक्ष लागले आहे.

## कोयत्याचा धाक...

गुन्हा दाखल झाल्याची कुणकुण लागताच नराधम सूरज खरात आपला ट्रॅक्टर हादगाव शिवारात सोडून फरार झाला आहे. सध्या 'पिंक पथका'चे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक प्रकाश शेळके या प्रकरणाचा तपास करत असून फरार आरोपीच्या मुसक्या आवळण्यासाठी पोलीस शोध घेत आहेत.

## पोलीस भरतीसाठी ....

सकाळी परळीहून बीड येथे पोलीस भरतीसाठी दाखल झाला होता. भरती दरम्यान कवायत, धावणे आदी शारीरिक चाचण्या पूर्ण झाल्यानंतर त्याची वैद्यकीय तपासणी सुरू असतानाच अचानक मैदानावर भोवळ येऊन कोसळला त्याला उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याला मृत घोषित केले. डीहायड्रेशन मुळे हार्ट अटॅक आला असावा असा प्राथमिक अंदाज डॉक्टरांनी व्यक्त केला आहे दीपकचे आई-वडील ऊसतोड कामगार असून कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. मयत युवक दीपक याचे प्राथमिक व बारावीपर्यंतचे शिक्षण गावातच झाले आहे. उपजीविकेसाठी दीपक पुण्याला काम करत होता. मात्र पोलीस होण्याचे स्वप्न उराशी बाळगून तो गेल्या दोन महिन्यांपासून गावाकडे येऊन पोलीस भरतीची तयारी करत होता. त्याचा एक लहान भाऊ असुन तो ऑटो रिक्षा चालवतो. ऊसतोड मजूर असलेल्या या कुटुंबात कुटुंबाचा आधार होण्याची धडपड करणाऱ्या या युवकावर नियतीने अशा पद्धतीने घाला घातल्याने मांडेखेल गावात शोक व्यक्त केला जात आहे. या दुर्दैवी घटनेमुळे मांडेखेल व परळी परिसरात हळहळ व्यक्त होत असून या कुटुंबावर शोककळा पसरली आहे.

## अतिवृष्टी नुकसानीच्या....

स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजन करण्यात आले . बीड जिल्ह्यातील बाधित भागांची प्रत्यक्ष पाहणी ११ फेब्रुवारी रोजी करण्यात आली . आधी केंद्रीय पथकाने यावेळी गेवराई तालुक्यातील खामगाव , राक्षस भुवन , धोंडराई , गेवराई , हिरापूर , ईटकुर या ठिकाणी भेटी दिल्या . संपूर्ण दौऱ्याच्या दरम्यान उपविभागीय अधिकारी कविता जाधव, तहसीलदार संदीप खोमणे , गटविकास अधिकारी अनिरुद्ध सानप , तालुका कृषी अधिकारी श्री गिरी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता रवींद्र तोंडे , पाटबंधारे विभागाचे अधिकारी , नायब तहसीलदार संजय सोनवणे , पोलीस उपनिरीक्षक जयराज उबाळे व विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते . यानंतर पथकाने बीड तालुक्यातील नांदूर हवेली येथील सिंदफणा नदीच्या काठालगत खरडून गेलेल्या जमिनीची आणि काळाने भरलेल्या विहिरी यांची पाहणी केली . यावेळी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके , गावचे सरपंच शाहेद पटेल व अनेक गावकरी उपस्थित होते . यावेळी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी पथकास सविस्तर माहिती दिली . केंद्रीय पथकाने शिरूर मधील प्रमाणात ब्रह्मनाथ येळंब या गावात भेट दिली व तालुक्यातील विविध अधिकारी यांच्यासोबत आपत्ती विषयक चर्चा केली व माहिती घेतली. या पाहणीनंतर तयार होणारा पीडीएनए अहवाल केंद्र सरकारकडे पाठविण्यात येणार असून, त्याच्या आधारे शेती, पायाभूत सुविधा, घरे, रस्ते आदी क्षेत्रांतील नुकसानीसाठी केंद्राकडून आर्थिक मदत मिळण्याची अपेक्षा आहे.

## छत्रपती संभाजीनगरमध्ये...

पथक केंद्रावर पोहचल्यानंतर त्यांना एकसारखी उत्तरं असणारे ९ कागद सापडले. त्यानुसार सर्वच वर्गातील सीसीटीव्हीची तपासणी केल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. त्यानंतर बोर्डाने या सर्व विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका जप्त केल्यात. या प्रकरणी केंद्र संचालक, पर्यवेक्षक आणि कर्मचारी अशा एकूण १९ जणांविरुद्ध देवगाव रंगारी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या सर्व १९ जणांना निलंबित ही करण्यात आले आहे, ज्या केंद्रावर हा प्रकार घडला, तिथे १४ वर्गांमध्ये एकूण ३७० विद्यार्थी परीक्षा देत होते. सीसीटीव्ही फुटेजमध्ये अनेक विद्यार्थी कॉपी करताना दिसत असले, तरी चौकशी करून विद्यार्थ्यांवर कारवाई करायचा निर्णय आता राज्य बोर्ड घेणार आहे. राज्य महामंडळांना यावर्षीपासूनच परीक्षा हॉलमध्ये सीसीटीव्ही लावण्याचा निर्णय घेतला आणि या निर्णयामुळे सुरू असलेला हा मास कॉफीचा प्रकार उघड झाला.

◆ पान ४ वरून पुढे...

## चंपावती महोत्सवाने...

ना. एकनाथजी शिंदे महाकरंडकाचा बक्षीस वितरण महासोहळा मंगळवार, दि. १० फेब्रुवारी २०२६ रोजी सायं. ५ ते रात्री ११ वाजेपर्यंत उत्साहात पार पडला. इंग्रजी, मराठी माध्यमांसह जिल्हा परिषद शाळांचा लक्षणीय सहभाग हे या महोत्सवाचे विशेष आकर्षण ठरले. या महोत्सवात केवळ बालकलाकारांचाच नव्हे तर शिक्षकांच्या कार्यकर्तृत्वाचाही गौरव करण्यात आला. विशेष पारितोषिकांतर्गत अनिलदादा जगताप 'जिल्हाप्रमुख सन्मान' प्रदान करण्यात आला. उत्कृष्ट मुख्याध्यापक गीता कुलकर्णी (प्रमोदजी महाजन स्कूल, अंबाजोगाई), अन्वर शेख (सिंदफना पब्लिक स्कूल, माजलगाव), दिपाली डाके (रायजिंग स्टार स्कूल, बीड), मेघा बिर्ला (किशोरी इंग्लिश स्कूल, बीड), कीर्ती साळुंके (विनायक विद्यालय, बीड). यांना गौरविण्यात आले. तसेच बेस्ट टीचर पुरस्काराने तुषार बुरगे (आदर्श विद्यालय, बीड), उर्मिला बर्दापूरकर (संस्कार विद्यालय), शोभा कांबळे (श्री छत्रपती शाहू विद्यालय, बीड), दिनेश दोडके (केएसपी विद्यालय, बीड), कुंदा कुलकर्णी (संस्कार इंग्लिश स्कूल) यांना सन्मानित करण्यात आले. बेस्ट डान्स टीचर स्वरूपा कुलकर्णी (विवेकानंद बालमंदिर, अंबाजोगाई – पाऊरी नृत्य), बेस्ट म्युझिक टीचर – शुभांगी मोरे (श्री भगवान स्कूल, बीड), बेस्ट ड्रॉईंग टीचर – प्रसाद देशपांडे (दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूल, परळी), बेस्ट ड्रामा टीचर – सखाराम जोशी (सिंदफना पब्लिक स्कूल, माजलगाव) यांना विशेष सन्मान देण्यात आला.

या बक्षीस वितरण महासोहळ्याचे उद्घाटन बीड जिल्हाधिकारी यांच्या शुभहस्ते झाले. बीड जिल्ह्याची ओळख बनलेला चंपावती महोत्सव भविष्यात महाराष्ट्राची ओळख व्हावी, अशा शुभेच्छा त्यांनी यावेळी दिल्या. या कार्यक्रमाला दै. झुंजारनेताचे संपादक अजित भाऊ वरपे, सौ. आशाताई वरपे, दै. लोकप्रभाचे संपादक संतोषजी मानूरकर, दै. लोकप्रश्नचे संपादक दिलीप भाऊ खिस्ती, शिवसेना धाराशिवचे माजी जिल्हाप्रमुख अनिल खोचरे, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, महिला आघाडी संपर्कप्रमुख संगीताताई चव्हाण, सतीश सोळंके, दिनकरराव कदम, विलासराव बडगे, अरुणनाना डाके, सखाराम मस्के, नानासाहेब काकडे, तान्हाजी कदम, पत्रकार सुरेश जाधव, दीपक जाधव, अमीर हुसेन, उदय नागरगोजे, आकाश सावंत, लक्ष्मीकांत रुईकर, वैभव स्वामी, सतीश शेळके, विकास माने, आनंद वीर यांच्यासह शिवसेना, युवासेना, महिला आघाडी, शेतकरी सेना, ओबीसी व्हिजिलन्स सेना, एसटी कामगार सेना व सर्व अंगीकृत संघटनांचे पदाधिकारी व लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. चंपावती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष प्रतीक कांबळे यांनी प्रास्ताविकात महोत्सवाची सविस्तर माहिती दिली. तर शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी, बालकलाकारांच्या हक्काचा चंपावती महोत्सव कदापी बंद पडू देणार नाही. हा कलेचा सोहळा अविरत सुरू राहील, असा निर्धार व्यक्त केला. शिवसेनेचे अनिल खोचरे यांनीही चंपावती महोत्सवातून भविष्यातील कलाकारांची सुसंस्कृत पिढी घडत असल्याचे सांगत शुभेच्छा दिल्या. कलेचा गौरव, कलाकारांचा सन्मान आणि बीडची सांस्कृतिक ओळख अधिक भक्कम करणारा चंपावती महोत्सव यंदाही यशस्वीपणे संपन्न झाला.

## खरीप २०२५...

तुटपुंजी असून शासनाच्या घोषणेनुसार संपूर्ण मदत मिळालेली नाही, अशी तक्रार शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे. याबाबत स्वराज्य जनजागृती परिषदेचे सचिव श्री. तुषार पाटील यांनी शासनाकडे तीव्र शब्दांत मागणी केली आहे की, शेतकरी आधीच आर्थिक संकटात सापडलेला असताना शासनाने केलेली घोषणा तात्काळ अमलात आणावी व प्रत्येक पात्र शेतकऱ्याच्या खात्यावर हेक्टरी १७ हजार रुपये तत्काळ जमा करावेत. या संदर्भात लवकरच महाराष्ट्राचे कृषिमंत्री जिल्हाधिकारी तसेच जिल्हा कृषी अधिकारी यांना निवेदन देण्यात येणार असल्याची माहिती श्री. पाटील यांनी दिली आहे.

## मच्छिंद्रनाथ संजीवन...

अधिकारी उपस्थित होते. बैठकीत भाविकांच्या सोयीसुविधांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यामध्ये दर्शन रांग व्यवस्था, व्हीआयपी दर्शन व्यवस्था, पार्किंग व्यवस्था, मोफत अन्नदान, कावड व्यवस्था, मळी काढणे, सुरक्षा व्यवस्था, विद्युत व पाणीपुरवठा, आरोग्य सेवा तसेच इतर आवश्यक व्यवस्थांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. भाविकांना कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने व जबाबदारीने काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला संजीवन समाधी उघडण्यात आल्यानंतर दुसऱ्या दिवशी सूर्योदयापूर्वी ती पुन्हा झाकण्यात येते. या कालावधीत मच्छिंद्रनाथांच्या संजीवन समाधीवर गंगाजल व चंदनाने अभिषेक करण्यात येतो. यावेळी मोठी यात्रा भरत असून हा सोहळा नाथभक्तांसाठी श्रद्धा व भक्तीचा केंद्रबिंदू ठरतो.

नाथ संप्रदायातील ही प्राचीन अध्यात्मिक परंपरा श्रद्धा व भक्तीचे प्रतीक मानली जाते. श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड, सावरगाव मायंबा हे नाथ संप्रदायातील अत्यंत महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असून या संजीवन समाधी सोहळ्याला विशेष धार्मिक महत्त्व आहे.

## कॉमनवेल्थ मेडिकल...

की नसेल याचा विचार न करता आपल्या मायभुमीत पाय ठेवत अंबाजोगाई शहरात अत्याधुनिक यंत्र सामुग्रीच्या माध्यमातून आणि महागडी यंत्रणा कार्यान्वित करुन रुग्णांना उत्कृष्ट व दर्जेदार सेवा दिली पाहिजे या जाणीवेतून अंबाजोगाईतील पहिले सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल सुरु केले. त्यासोबतच इतर सहकारी पाच डॉक्टरांना सोबत घेवून रुग्णाना सर्व आजारांचे निदान आणि उपचार एकाच ठिकाणी करता आले पाहिजेत यासाठी यंत्रणा कार्यान्वित केली.त्या माध्यमातून आजपर्यंत हजारो रुग्णांना चांगल्या सुविधा एकाच छताखाली देण्यात डॉ.नवनाथ घुगे यांना यश आले आहे. त्यासोबतच अंबाजोगाई शहरात त्यांनी सुपर स्पेशालिटी आयसीयू हॉस्पिटल, एमआरआय सेंटर व इतर वेगवेगळ्या सेवा सुविधा देण्याचा त्यांचा प्रयत्न राहिला आहे. रुग्णांची एखाद्या तपासणीमुळे गैरसोय होवू नये किंवा तो दगावू नये याची काळजी त्यांनी घेतलेली आहे. गेल्या २१ वर्षामध्ये त्यांच्या वैद्यकीय सेवेचे कौतुक आणि सन्मान वेगवेगळ्या संस्थांनी केलेला आहे. नामांकित पुरस्कार त्यांना मिळालेले आहेत. त्यातच आता त्यांच्या माध्यमातून अंबाजोगाई शहराला मानाचा तुरा मिळाला आहे. ज्यामध्ये अंतराष्ट्रीय स्तरावर काम करणार्या कॉमनवेल्थ मेडिकल असोसिएशन लंडन या संस्थेने डॉ.नवनाथ घुगे यांना फेलोशिपने चेन्नई येथे आयोजित जागतिक वैद्यकीय परिषदेच्या कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी कॉमनवेल्थ मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष प्रो.डॉ.जे.ए.जयालाल यांच्या हस्ते फेलोशिप प्रदान करण्यात आली. कॉमनवेल्थ मेडिकल असोसिएशन हे जगातील ५४ देशांचे संघटन आहे त्या मार्फत जागतिक आरोग्य सेवा, पर्यावरण व वातावरणातील बदल, प्रदुषण, आरोग्य शिक्षण, आरोग्य विषयी संशोधन अशा अनेक विषयांवर जागतिक स्तरावर काम करणारी संघटना आहे. या संघटनेने डॉ.नवनाथ घुगे यांना गौरविल्याबद्दल हा मैलाचा दगड ठरला आहे. त्यांच्या कार्याला गती देण्याचे काम त्यांच्या पत्नी सौ.सारिकाताई नवनाथ घुगे यांनी केले आहे.कारण वैद्यकीय सेवेत काम करीत असताना पूर्ण समर्पित सेवेतून काम करावे लागते पण जी कौटुंबिक जबाबदारी असते त्याकडे दुर्लक्ष होते अशा काळात सौ.सारिकाताई घुगे त्यांनी ती उणीव भरून काढत त्यांना प्रोत्साहन देण्याचे काम केले आहे.डॉ . घुगे यांना फेलोशिप प्रदान केल्यानंतर राज्याच्या पर्यावरण मंत्री ना.पंकजाताई मुंडे, माजी मंत्री आ. धनंजय मुंडे, आ.नमिताताई मुंदडा, माजी राज्यमंत्री ॲड. पंडितराव दौड, आय.एम.ए.चे प्रदेशाध्यक्ष डॉ.संतोष कुलकर्णी, डॉ रवींद्र कुटे( माजी राज्य अध्यक्ष आय एम ए) माजी आ. संजयभाऊ दौंड, नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा, आ. पृथ्वीराज साठे, माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्यासह वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन व कौतुक केले आहे.

## तांदळा येथे...

मर्यादित न राहता समाजोपयोगी कार्यातून समाजाशी नाळ जपण्याचा संदेश शिवसेनेचे गेवराई विधानसभा प्रमुख नवनाथ गवते व तांदळा गावच्या विद्यमान सरपंच सौ.सोनाली नवनाथ गवते यांनी या उपक्रमातून दिला आहे. त्यांनी तांदळा येथील वारकरी संप्रदायाला मृदंग व टाळ भेट देण्यात आले. वारकरी परंपरेचा जप आणि भजन–कीर्तन परंपरेला चालना मिळावी, या उद्देशाने ही भेट देण्यात आली. वारकऱ्यांनी या उपक्रमाचे स्वागत करत समाधान व्यक्त केले. त्याचबरोबर श्रीराम संस्थान, तिंतरवणी येथे सुमारे दीडशे मुलांना एक दिवसाचे अन्नदान देखील यावेळी करण्यात आले. लहानग्यांना प्रेमपूर्वक भोजन देत वाढदिवसाचे औचित्य सामाजिक बांधिलकी जपत साजरे करण्यात आले. या अन्नदान उपक्रमामुळे मुलांच्या चेहऱ्यावर आनंद झळकताना दिसून आला. हा संपूर्ण उपक्रम शिवसेनेचे जिल्हाप्रमुख चंद्रकांत नवले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. या कार्यक्रमास ग्रामस्थ, शिवसेनेचे गेवराई तालुक्यातील सर्व पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिक्षण महर्षी 'स्व. गोविंदराव....

स्पर्धेत जास्तीत जास्त शाळांनी सहभागी व्हावे असे आवाहन शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा स्पर्धेचे आयोजन श्री. गणेश वाघ यांनी केले.

छत्रपती शिवाजी महाराज –फुले –शाहू आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा घेऊन स्व. यशवंतराव चव्हाण साहेब यांच्या कार्याने प्रेरित झालेले व शिक्षण क्षेत्रात संपूर्ण आयुष्य समर्पित केलेले बीड जिल्ह्यात नामांकित व्यक्तिमत्व असणारे शिक्षणमहर्षी स्व. गोविंदराव (नाना) वाघ यांच्या जयंतीचे औचित्य साधून त्यांनी शिक्षण क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची आठवण जपत त्यांच्या जयंतीदिनी त्यांच्या स्मृतीला अभिवादन करण्याच्या उद्देशाने विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी भव्य आंतरशालेय रंगभरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा प्राथमिक गट (इयत्ता ५ वी ते ७ वी) आणि माध्यमिक गट ( इयत्ता ८ वी ते १० वी) या दोन गटात घेण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना इतिहासाची ओळख आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मस्थळा विषयी अभिमान जागविण्याचा प्रयत्न करण्याच्या उद्देशाने प्राथमिक गटासाठी शिवनेरी किल्ला हा विषय देण्यात आला आहे. तर माध्यमिक गटातील विद्यार्थ्यांना व्यक्तीचित्र रेखाटनाद्वारे निरीक्षणशक्ती, बारकावे टिपण्याची क्षमता आणि सर्जनशीलता व्यक्त करण्याच्या उद्देशाने माध्यमिक गटासाठी व्यक्तीचित्र (पोर्ट्रेट) हा विषय देण्यात आला आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून माध्यमिक गटातील विद्यार्थ्यांना व्यक्तीचित्र रेखाटनाद्वारे निरीक्षणशक्ती, बारकावे टिपण्याची क्षमता आणि सर्जनशीलता व्यक्त करण्याची संधी मिळणार आहे. या स्पर्धेसाठी बीड शहरातील यशवंत नगर भागातील यशवंत विद्यालय बीड आणि शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालय ही स्पर्धा होणार आहे. या ठिकाणी प्रत्येक सहभागी शाळेने दोन्ही गटांमधून प्रत्येकी दोन–दोन विद्यार्थी स्पर्धेसाठी पाठवावेत. या स्पर्धेसाठी लागणारा कागद आयोजकांकडून पुरविण्यात येईल. रंग, ब्रश, पेन्सिल व इतर साहित्य स्पर्धकांनी स्वतः आणणे आवश्यक आहे. ही स्पर्धा पूर्णतः निःशुल्क आहे. प्रवेशिका जमा करण्याची अंतिम तारीख १३ फेब्रुवारी २०२६ आहे. या दोन्ही गटांतील प्रथम, द्वितीय आणि तृतीय विजेत्यांना स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्र आणि रोख पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. या शिवाय इतर क्रमांकांनाही उत्तेजनार्थ बक्षीसे देण्यात येणार आहेत. स्पर्धेचे बक्षीस वितरण गुरुवार, १९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता संबंधित स्पर्धा केंद्रांवर करण्यात येणार आहे. या स्पर्धे साठी शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. गणेश वाघ सर यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग परिश्रम घेत आहेत. या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, कल्पकता आणि आत्मविश्वास वृद्धिंगत करण्यास नक्कीच हातभार लावेल, असा विश्वास शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ बीडचे अध्यक्ष श्री. गणेश वाघ यांनी व्यक्त करत या स्पर्धेत जास्तीत जास्त शाळां आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आपल्या कलागुणांचे प्रदर्शन करावे, असे आवाहन श्री गणेश वाघ सर यांनी केले.

## शैक्षणिक,सांस्कृतिक,...

कार्यक्रमांनी सजलेल्या या सोहळ्यात विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे प्रभावी दर्शन घडवून उपस्थित पालक व मान्यवरांची मने जिंकली.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध नृत्य, नाट्य व गीतांनी वातावरण भारावून गेले. विशेष आकर्षण ठरले ते छत्रपती संभाजी महाराज आणि कवी कलश यांच्या जीवनावर आधारित नाट्यप्रयोगाचे. संभाजी महाराजांना बंदी केल्यानंतर त्यांच्यावर करण्यात आलेल्या अमानुष अत्याचारांचे आणि त्यांच्या निर्दयी हत्येचे दृश्य विद्यार्थ्यांनी अत्यंत प्रभावीपणे साकारले. या प्रसंगाने उपस्थितांच्या अंगावर अक्षरशः शहारे आले. विद्यार्थ्यांच्या अभिनयकौशल्यामुळे अनेकांच्या डोळ्यांत अश्रू तरळले आणि काही काळ स्तब्धता पसरली.

याचबरोबर भक्त प्रल्हाद आणि भगवान विष्णूंच्या नृसिंह अवतारावर आधारित गीत–नाट्य सादरीकरणाने धार्मिक आणि सांस्कृतिक मूल्यांची जाणीव करून दिली. लहानग्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या या कार्यक्रमाला विशेष दाद मिळाली.

इयत्ता पहिलीपासून ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी विविध देशभक्तीपर, पारंपरिक तसेच आधुनिक गीतांवर सादर केलेल्या नृत्याविष्कारांनी कार्यक्रमाची रंगत वाढवली. आकर्षक वेशभूषा, नेटक्या हालचाली आणि आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणामुळे प्रत्येक कार्यक्रमाला टाळ्यांचा कडकडाट लाभला.

यावेळी शाळेचे प्राचार्य अविनाश राऊत यांनी आपल्या प्रास्ताविकात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.पालकांनीही शाळेच्या उपक्रमांचे कौतुक करत विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव दिल्याबद्दल समाधान व्यक्त केले.एकूणच, अनिशा ग्लोबल स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलनाने विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या कला, आत्मविश्वास आणि संस्कारांचे सुंदर दर्शन घडवले. हा सोहळा उपस्थितांच्या स्मरणात दीर्घकाळ राहील, अशी भावना अनेकांनी व्यक्त केली.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# महाशिवरात्री निमित्त श्रीक्षेत्र वेरूळ येथे महास्वच्छता अभियान

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

श्री.क्षेत्र वेरूळ येथील बारा ज्योति लिंगापैकी एक समजल्या जाणाऱ्या घृष्णेश्वर मंदिरात महाशिवरात्री निमित्त हजारो भाविक दर्शनासाठी येतात यासाठी प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक अंकित यांच्या संकल्पनेतून महास्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दूरदृश्यप्रणालीद्वारेआढावा घेतला. १३ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी १२ या वेळेत महास्वच्छता अभियान



राबविण्यात येणार आहे यामध्ये वेरूळ येथील एमटीडीसी पार्किंग ते अरिहंत चौक पर्यंत, अरिहंत चौक ते कमल हॉटेल समोर एसटी महामंडळ भूखंड, येळगंगा नदी परिसर, येळगंगा नदी ते तलाठी कार्यालय, तलाठी कार्यालय ते तीर्थकुंड, तीर्थकुंड ते भोसले चौक, भोसले चौक ते अशोक हॉटेल, भोसले चौक ते क्राऊन हॉटेल या परिसराची स्वच्छता करण्याची जबाबदारी विभागून गटविकास अधिकारी छत्रपती संभाजीनगर, खुलताबाद, गंगापूर, कन्नड तालुक्यांच्या गटविकास अधिकारी यांना दिलेली आहे यासाठी तालुका खुलताबाद, कन्नड, गंगापूर, छत्रपती संभाजी नगर येथील २८५ ग्रामपंचायत अधिकारी, गटविकास अधिकारी कार्यालयातील सर्व विभाग प्रमुख, कर्मचारी, तहसीलदार कार्यालयातील विभाग प्रमुख कर्मचारी, जिल्हास्तरावरील विभाग प्रमुख सहभागी होणार आहेत या महास्वच्छता अभियानात खुलताबाद, कन्नड, छत्रपती संभाजी नगर, गंगापूर तालुक्यातील सर्व विभाग प्रमुख ग्रामपंचायत अधिकारी, जिल्हास्तरावरील विभाग प्रमुख यांनी उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक अंकित, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत चंद्रहार ढोकणे, उपमुख्य कार्यकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अधिकारी पाणी व स्वच्छता डॉ ओम प्रकाश रामावत, सहाय्यक गट विकास अधिकारी साहेबराव चव्हाण, विस्तार अधिकारी पंचायत मंगेश कुंटे, सहायक प्रशासनाधिकारी संजय दारवंटे यांनी केले आहे.

# महा पशुधन एक्स्पो व जिल्हा कृषी महोत्सव २०२६ चे दि १३ ते १५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन पशु संवर्धन, कृषी विभाग व कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), बीड आयोजित महा पशुधन एक्स्पो व जिल्हा कृषी महोत्सव २०२६ चे दि १३ ते १५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत ३ दिवसीय कृषी महोत्सव आयोजित करण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाची माहिती मिळावी या उद्देशाने मा जिल्हाधिकारी, बीड श्री विवेक जॉन्सन, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी तथा प्रकल्प संचालक आत्मा,बीड श्री सुभाष साळवे यांचे सनियंत्रणाखाली दिनांक १३ ते १५ फेब्रुवारी २०२६ दरम्यान ओपळे मैदान, वैद्यनाथ महाविद्यालय समोर, अंबाजोगाई रस्ता, परळी वैजनाथ, जिल्हा बीड येथे भव्य असे तीन दिवसीय महा पशुधन एक्स्पो व जिल्हा कृषी महोत्सव २०२६ चे आयोजन केले असल्याची माहिती कृषी प्रदर्शन संयोजक प्रकल्प संचालक आत्मा, बीड यांनी दिली आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना नवीनतम तंत्रज्ञान मिळावे, कृषी प्रदर्शन, पशु प्रदर्शन, परिसंवाद, चर्चासत्र, उत्पादक ते ग्राहक थेट विक्री /धान्य महोत्सव , शेतकरी सन्मान समारंभ, अत्याधुनिक कृषी अवजारे प्रदर्शन, शेतकरी उत्पादक कंपनी व सेंद्रिय शेती गट उत्पादित धान्यफळे फुले,भाजीपाला महोत्सव विक्री होणार आहे पौष्टिक तृणधान्य पिकांना प्रोत्साहन म्हणून त्याची माहिती मिळणार आहे. भव्य कृषी प्रदर्शन, शेतकरी मेळावे खरेदीदार-विक्रेता संमेलन,शेतकरी मेळावा त्याचबरोबर खाद्य महोत्सव मेजवानी ही शेतकरी व भेट देणाऱ्या नागरिकांना मिळणारआहे. महा पशुधन एक्स्पो व जिल्हा कृषी महोत्सव २०२६ मध्ये भव्य अशा ३०० दालनाद्वारे कृषी उत्पादनांची कृषी अवजारांची, प्रात्यक्षिके या प्रदर्शनात पहावयास मिळणार आहेत. तसेच पशु प्रदर्शनामध्ये गाय, म्हैस, श्वान, घोडे, पक्षी, ई. पहावयास मिळणार आहे. तज्ञांची चर्चासत्रे आदी उपक्रम या प्रदर्शनास होणार आहेत. विविध मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदर्शनाचे उद्धाटन व समारोप प्रसंगी कृषीक्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे शेतकऱ्यांचा गौरव करण्यात येणार आहे. प्रदर्शनाचा बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा प्रशासन बीड यांनी केले आहे.

# महिलांच्या खुल्या गीत गायन कराओके स्पर्धेचे बीडमध्ये आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील कलाकार ग्रुप यांच्या वतीने महिलांसाठी खुल्या गीत गायन कराओके स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा दिनांक १४ फेब्रुवारी २०२६ रोजी बाबासाहेब आंबेडकर भवन, हॉल, नगर रोड, बीड येथे दुपारी १२.०० ते सायं. ५.०० या वेळेत संपन्न होणार आहे.



या स्पर्धेतील विजेत्यांसाठी आकर्षक रोख पारितोषिके व सन्मानचिन्हे देण्यात येणार आहेत. प्रथम पारितोषिक: रु. ५०००/- व सन्मानचिन्ह (आर्यन ट्रेडर्सचे प्रो. प्रा. अमोल बागलाने यांच्या वतीने), द्वितीय पारितोषिक: रु. ३०००/- व सन्मानचिन्ह (रोख, अथर उर्फ बब्बु यांच्या वतीने), तृतीय पारितोषिक: रु. २०००/- व सन्मानचिन्ह (श्री. बबनराव वडमारे यांच्या वतीने) उत्तेजनार्थ पारितोषिके: प्रत्येकी रु. १०००/- व सन्मानचिन्ह (एकूण ३ पारितोषिके) - श्री. राजाभाऊ गुजर, नगरसेवक, बोड यांच्या वतीने स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणार्या इच्छुक महिलांनी आपला प्रवेश निश्चित करण्यासाठी १३ फेब्रुवारी २०२६ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत प्रवेश शुल्क रु. ५००/- संयोजक ॲड. अविनाश गडगे (मो. नं. ९४२२२४४५१०) यांच्याकडे ऑनलाईन जमा करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे संयोजक श्री. बबनराव वडमारे, श्री. मॅथ्यु जोसफ, श्री. विराज प्रकाश, श्री. कैलास थोरात, नइम इनामंदार, डॉ. सुधिर साळवी व श्री. जनार्धन वडमारे यांनी अधिकाधिक महिलांनी सहभाग नोंदवून स्पर्धा यशस्वी करावी, असे आवाहन केले आहे. स्पर्धा समाप्तीनंतर त्याच ठिकाणी त्वरित बक्षीस वितरण सोहळा पार पडणार आहे.

# श्री मुक्तानंद महाविद्यालय येथे कॉपीमुक्त वातावरणात बारावीच्या सुरू

**बीड । प्रतिनिधी**

गंगापूर येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचालित श्री मुक्तानंद महाविद्यालयात इयत्ता बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्त व भयमुक्त वातावरणात सुरु असून कॉपीमुक्त मोहिमेस विद्यार्थी व पालक याचा उत्स्फूर्त प्रतिसाद दिसून येत आहे. महाराष्ट्र उच्चमाध्यमिक बोर्डाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या इयत्ता बारावी वर्गाच्या परीक्षेला दि. १०/०२/२०२६ पासून सुरुवात झाली असून मा. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, शिक्षणाधिकारी माध्यमिक श्रीमती अश्विनी लाटकर यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण जिल्हाभरात कॉपीमुक्ती अभियान राबवले जात आहे. याचाच





एक भाग म्हणून श्री मुक्तानंद महाविद्यालय येथे कॉपी मुक्त व भयमुक्त वातावरणात परीक्षेला सुरुवात झालेली आहे. परीक्षेस येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याची तपासणी करूनच त्याला परीक्षा दालनात प्रवेश दिला जात आहे. सदरील परीक्षा सुरळीत व शांततेत पार पडावी यासाठी प्रत्येक दालनात CCTV बसवण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी बोर्डाच्या सूचनेनुसार परीक्षेसाठी लागणाऱ्या सर्व भौतिक सुविधा महाविद्यालयाकडू उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच परीक्षेसंदर्भात विद्यार्थ्यांना मानसिक ताणतणाव दूर करण्यासाठी योग्य ते मार्गदर्शन करण्यात येत आहे. परीक्षेदरम्यान कुठलाही गैरप्रकार व गोधळ होऊ नये यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री रामराव चव्हाण, उपप्राचार्य श्री विशाल साबणे, पर्यवेक्षक श्री हरिराम सातपुते हे लक्ष ठेऊन आहे. तसेच ही परीक्षा सुरळीत पारपडण्यासाठी उपप्राचार्य श्री बी. टी. पवार, श्रीमती वैशाली बागुल, केंद्रसंचालक प्रा. श्रीराम मगर, प्रा. संदीप गायके, प्रा. शिवाजी शिंदे, श्री कृष्णा सोटम इत्यादी प्रयत्न करत आहेत.

प्रश्न :- तणावमुक्त परीक्षेसाठी विद्यार्थ्यांसाठी काय करावे ?

प्राचार्य :- विद्यार्थ्यांनी वेळेचे योग्य नियोजन करून अभ्यास करावा सहजतेने व खेळीमेळीच्या वातावरणात कसे परीक्षेला सामोरे जाता येईल याची काळजी घ्यावी. कुठलाही गैरप्रकार करू नये. विद्यार्थी तणावमुक्त वातावरणात कशी परीक्षा देईल यासाठी आम्ही वेळोवेळी मार्गदर्शन करत आहोत. - प्रा. रामराव चव्हाण, प्राचार्य.

प्रश्न:- महाविद्यालात किती परीक्षार्थी आहेत व यांचे नियोजन आपण कसे केले आहे ?

उत्तर:- यावर्षी बोर्ड मार्फत एकूण ८३२ परीक्षार्थी या महाविद्यालया साठी देण्यात आले आहे. इंग्रजी विषयासाठी एकूण ३४ हॉल चे नियोजन करण्यात आले होते. गंगापूर तालुक्यातील इतर केंद्रे बंद करण्यात आले असल्यामुळे आमच्यावर जास्त परीक्षार्थींचे नियोजन करण्याची जबाबदारी होती. शासन आदेशाप्रमाणे, मा. जिल्हाधिकारी, शिक्षणाधिकारी यांनी दिलेल्या सूचनांचे पालन करून आनंददायी व तणावमुक्त परीक्षा घेण्यात येत आहे. - प्रा. विशाल साबणे, उपप्राचार्य.

# जीवनातील विविध घटना, प्रसंग अचुक सांगणारे पाटोद्याचे राजेंद्र महाराज लोखंडे यांचे कार्य कौतुकास्पद

**बीड । प्रतिनिधी**

राजेंद्र महाराज लोखंडे या अवलियाला एक अदभुत किमया अवगत आहे. लोखंडे महाराज आपल्या अदभुत लॉजीकने पुढील व मागील अनेक वर्षामधील सणावारांच्या तारखा अगदी अचुकपणे सांगतात.

एवढेच नाही तर समोरील माणसांच्या जन्मतारखा देखील वारासह सांगतात. पाटोदा तालुक्यातील दिघोळ येथील राजेंद्र गंगाराम लोखंडे हे काही वर्षांपूर्वी शिक्षण व कामाच्या निमीत्ताने पाटोदा शहरात आले आणि येथेच स्थायिक झाले. शाळेत असल्यापासुनच राजेंद्र लोखंडे हे अध्यात्मिक वृत्तीचे आहेत. काहीसे गुढ वागत, त्यावेळी खेमानंद महाराज यांचे शिष्यत्व त्यांनी पत्करले होते.



पाटोद्यात आल्यानंतर त्यांनी एम.ए. पर्यंतचे आपले शिक्षण पूर्ण करून काही काळ ह.भ.प. रामकृष्ण रंधवे महाराज यांच्या संस्थेत नोकरी ही केली, मात्र त्यांच्या अध्यात्माकडेच अधिक कल राहीला. महाराज ब्रम्हचारी आहेत. दरम्यान त्यांच्या या गुढ वागणुकीतुनच त्यांच्यातील अनोख्या तर्कशक्तीची जाण होऊ लागली. एखांदी अनोळखी व्यक्ती जरी त्यांच्यासमोर गेली आणि त्यांना वाटले तर ते व्यक्तिची जन्मतारीख, वारासह अगदी अचुकपणे सांगतात. त्यांच्या तारखेच्या तर्कशास्त्रानुसार त्या व्यक्तिच्या जीवनात भविष्यत घडू शकणाऱ्याही काही घटनांचा वेध सांगु शकतात. वर्तविलेले अंदाज खरे ठरू लागले आहेत. माजी मंत्री आ.धनजंय मुंडे व लोकनेत्या पंकजाताई मुंडे हे बहीणभाऊ मार्च २०२४ मध्ये राजकारणात एकत्रीत येतील असा २०२० साली (चार वर्षापुर्वी) भविष्य सांगणारे लोखंडे महाराज आहेत. मानवी जीवनातील गूढ वागुणुकीचे तर्कशास्त्र लोखंडे महाराज यांना अवगत आहे. मनुष्याचा फक्त चेहरा पाहून ते जन्मतारखेपासून, मृत्युच्यातारखे पर्यंतचा जीवनपट सांगतात. लोखंडे महाराजांनी राज्याच्या व बीड जिल्हयाच्या राजकारणावर आपले अंदाज व मत नोंदवले २०४० साली नोव्हेंबर महीन्यात ४ तारखेला दिवाळी आहे.

त्यादिवशी रविवार असेल, २०५५ साली २४ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्री बुधवार रोजी असेल, १९४७साली ६ मार्च रोजी होळीचा सण होता. तो दिवस बुधवारचा होता. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले तो वार शुक्रवार होता अशा प्रकारे पुढील व मागील ५० वर्ष आणि त्याही पेक्षा अधिक वर्षातील सणांच्या तारखा अगदी क्षणात कुणी बिनचुक सांगु शकेल यावर कोणाचा चटकन विश्वास बसणार नाही. मात्र पाटोदा येथील राजेंद्र महाराज लोखंडे या अवलियाला मात्र ही अदभुत किमया अवगत आहे. पाटोदा तालुक्यातील महासांगवी गावाकडे जाणाऱ्या रोडवर लोखंडे महाराज राहतात. बालवयात लोखंडे महाराजांवर धार्मिक संस्कार झाले असल्यामुळे अध्यात्माची चांगल्या प्रकारे त्यांना आवड निर्माण झाली आहे. भगवान शंकराचे ते भक्त आहेत. त्यांना भविष्य जाणण्याची विद्या प्राप्त झाली आहे. माणसाचा जन्मदिनांक, वेळ, तारीख ते अचूकपणे सांगतात. आपल्याकडे हस्तरेषा किंवा चेहरापाहून भविष्य सांगणारी माणसं आहेत पण ज्योतिष शास्त्राचा कसलाही अभ्यास न करता लोखंडे महाराज माणसाच्या जीवनाबाबत ज्या गोष्टी सांगतात हे मात्र आश्चर्यपेक्षा कमी नाही.

# अनादरीत धनादेशा प्रकरणी आरोपीस तीन लाख पन्नास हजार रुपये दंड व पाच महिने शिक्षा: ॲड. शशिकांत सावंत

**बीड । प्रतिनिधी**

येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी साहेब २ रे यांनी महत्त्वपूर्ण निकाल देऊन आरोपीस तब्बल तीन लाख पन्नास हजार रुपयाचा दंड करून पाच महिन्याची शिक्षा सुनावलेली आहे, घटनेची हकीकत अशी की, आरोपी शंकर प्रकाश कदम,यांनी फिर्यादी राहुल बन्सीधर घोडके ,यांच्याकडून रक्कम रुपये दोन लाख पन्नास हजार रुपये हात उसने म्हणून घेतले होते सदरची रक्कम परत करतेवेळी आरोपी यांनी फिर्यादी यांच्या हक्कांमध्ये रक्कम रुपये दोन लाख पन्नास हजार रुपयाचा धनादेश दिला होता सदरचा धनादेश बँकेत वाटेल व फिर्यादीस त्याची आरोपीकडे असणारी रक्कम त्यास मिळून जाईल असा शब्द व भरवसा दिला होता, परंतु सदरचा धनादेश बँकेत



अनादरीत झाला व खात्यावर पुरेशी रक्कम शिल्लक नाही या कारणाने परत आला त्यामुळे फिर्यादी,यांनी आरोपी यांच्या विरोधामध्ये बीड येथील प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी साहेब २ रे बीड यांचे न्यायालयात समरी क्रिमिनल केस क्रमांक.२६५५/१८ राहुल विरुद्ध शंकर असे प्रकरण दाखल केले सदर प्रकरणांमध्ये मा. न्यायालयाने गुणदोषावर प्रकरण चालून आरोपीच्या वतीने सावकारकीचा बचाव घेण्यात आला व त्याने फिर्यादी कडून व्याजाने पैसे घेतले होते व त्याने दिलेला सुरक्षा पोटीचा धनादेशाचा गैरवापर केल्याचा बचाव घेण्यात आला परंतु मा. न्यायालयाने आरोपीचा बचाव फेटाळून लावला व प्रकरणांमध्ये आरोपीने कलम १३८ निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट क्ट प्रमाणे गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे महत्त्वपूर्ण निकाल देऊन आरोपी शंकर प्रकाश कदम , यांना तीन लाख पन्नास हजार रुपये दंड व पाच महिन्याची शिक्षा सुनावलेली आहे सदर प्रकरणात फिर्यादीच्या वतीने ॲड. शशिकांत सावंत यांनी भक्कम बाजू मांडली, त्यांना ॲड. विशाल विलासराव कदम,ॲड. अभिषेक बहिर,ॲड. माऊली डाके ॲड. राजकुमार धरणे,ॲड. प्रदीप दराडे ॲड. विजय डोके,ॲड. अमोल तिडके,ॲड. प्रतीक गव्हाणे यांनी सहकार्य केले

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १११/२०२६**

**सिमा भ्र. रमेश शेळके वि. सुर्यभान देवराव शेळके**

ज्याअर्थी **मयत नामे १. शकुंतला भ्र. सुर्यभान शेळके, २. रमेश पि. सुर्यभान शेळके दोघे रा.चकलांबा ता. गेवराई जि.बीड हे/हया अनुक्रमे दिनांक ०६/०८/२०१७ व दिनांक १७/११/२०१६ रोजी चकलांबा ता. गेवराई जि.बीड** येथे मयत झाले / झाल्या आहेत, **अर्जदार क्र. १ सिमा भ्र. रमेश शेळके, वय ४० वर्षे, धंदा घरकाम, रा. चकलांबा ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. २ रंजना पि. रमेश शेळके, वय २३ वर्षे, धंदा घरकाम, रा. चकलांबा ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क्र. ३ भारत पि. रमेश शेळके, वय २० वर्षे, धंदा घरकाम, रा. चकलांबा ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. ४ सचिन पि. रमेश शेळके, वय १८ वर्षे, धंदा शिक्षण, रा. चकलांबा ता. गेवराई जि.बीड, गैरअर्जदार क्र. १ सुर्यभान पि. देवराव शेळके, वय ७७ वर्षे, धंदा शेती, रा. चकलांबा ता. गेवराई जि. बीड, गैरअर्जदार क्र. २ गणेश पि. सुर्यभान शेळके, वय ४८ वर्षे, धंदा शेती, रा. चकलांबा ता. गेवराई जि. बीड** यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **मयत १. शकुंतला भ्र. सुर्यभान शेळके, २. रमेश पि. सुर्यभान शेळके** यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १०/०२/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले. **पुढील तारीख - २५/०३/२०२५**

**(मार्फत - ॲड आय.बी. नागरे, गेवराई)**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय क.स्तर गेवराई**

**शिक्का** (स्वाक्षरीत) क. लिपीक

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १०२/२०२६**

**शेषेराव पि. परबत्ता उर्फ प्रभाता जोगदंड वि. निरंक**

ज्याअर्थी **मयत नामे सखाराम परबत्ता उर्फ प्रभाता जोगदंड हे/हया दिनांक ०९/०४/२०१६ रोजी पोखरी ता. गेवराई जि. बीड** येथे मयत झाले / झाल्या आहेत, **अर्जदार शेषेराव पि. परबत्ता उर्फ प्रभाता जोगदंड, वय ७७ वर्षे, धंदा शेती, रा. पोखरी ता. गेवराई जि.बीड** यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत सखाराम परबत्ता उर्फ प्रभाता जोगदंड यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १०/०२/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

**पुढील तारीख - २४/०३/२०२५**

**(मार्फत - ॲड. आर.ए. जोशी, गेवराई)**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय क.स्तर गेवराई**

**शिक्का** (स्वाक्षरीत) क. लिपीक

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ९२/२०२६**

**राधाबाई विठ्ठल गुंजाळ व इतर वि. निरंक**

अर्जदार - **१. श्रीमती राधाबाई भ्र. विठ्ठल गुंजाळ, वय ७२ वर्षे, धंदा घरकाम, रा. उमापुर ता. गेवराई जि.बीड. २. संतोष पि. विठ्ठल गुंजाळ, वय ४४ वर्षे, धंदा शेती, रा. सदर. ३. सौ. निता भ्र. कृष्णा पुंड, वय ४१ वर्षे, धंदा घरकाम, रा. देहेरे, पुंड वस्ती, अहिल्यानगर. ४. संभाजी पि. विठ्ठल गुंजाळ, वय ३८ वर्षे, धंदा शेती, रा. उमापुर, ता. गेवराई जि. बीड.**

ज्याअर्थी मयत विठ्ठल पि. श्रीपती गुंजाळ, रा. उमापुर ता. गेवराई जि.बीड हे/हया दिनांक ०८/०१/२०२६ रोजी रा. उमापुर ता. गेवराई जि.बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार क. १ ते ४ यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत विठ्ठल पि. श्रीपती गुंजाळ, रा. उमापुर ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०९/०२/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**पुढील तारीख :- १७/०३/२०२६**

**( मार्फत ॲड. आर. ए. जोशी, गेवराई)**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय क.स्तर गेवराई**

**शिक्का** (स्वाक्षरीत) क. लिपीक

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्रीमती. एस एच पाटील यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक: ९४ / २०२६**

**विष्णु - विरुद्ध- निरंक**

ज्याअर्थी मयत नामे मीरा विष्णु नाईकवाडे हे या दिनांक २०.०९.२०२२ रोजी मौजे गेवराई ता. गेवराई जि.बीड येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार- **१) विष्णुपि शेषेराव नाईकवाडे, वय ५३ वर्षे धंदा- मजुरी, रा. भवानी पेठ, मुख्य रस्ता, मेनरोड गेवराई ता. गेवराई जि. बीड. २) आदित्य पि. विष्णु नाईकवाडे, वय २२ वर्षे धंदा-मजुरी, रा. भवानी पेठ, मुख्य रस्ता, मेनरोड गेवराई ता. गेवराई जि. बीड.**

शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या ५ घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असंही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नाम मीरा विष्णु नाईकवाडे मेन रोड गेवराई ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**पुढील तारीख : २३.०३.२०२६**

**(मार्फत -अँड. बी. के. निकाळजे)**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय क.स्तर गेवराई**

**शिक्का** (स्वाक्षरीत) क. लिपीक

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# दैनिक मराठवाडा पत्र

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • गुरुवार, दि. १२ फेब्रुवारी २०२६ •

# चंपावती महोत्सवाने रचला नवा विक्रम

- १९,५७० बालकलाकारांचा सहभाग, ४७२ पारितोषिकांचे भव्य वितरण!
- चंपावती महोत्सवात संस्कार विद्यालय व श्री भगवान इंग्लिश स्कूल ठरले उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकरंडकाचे मानकरी!
- संसदरत्न खा. डॉ. श्रीकांतजी शिंदे करंडकावर व्हॅल्यू इंटरनॅशनल स्कूल व संस्कार विद्यालयाचा शिक्कामोर्तब!

**बीड । प्रतिनिधी**

बीडच्या कलाक्षेत्राला नवा उन्मेष देणाऱ्या सलग चौथ्या वर्षी संपन्न झालेल्या अनिलदादा जगताप फाउंडेशन आणि शिवसेना बीड आयोजित चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेने नवा विक्रम प्रस्थापित केला. बीड जिल्ह्यातील गेवराई, परळी, अंबाजोगाई, केज, माजलगाव, बीड, आष्टी, पाटोदा या तालुक्यांमधून, विविध ग्रामीण भागातील गाव खेड्यातून २९६ शाळांतील तब्बल १९ हजार ५७० बालकलाकारांनी नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकला व रांगोळी या विविध कला प्रकारांत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विविध स्पर्धे तील विजेत्या स्पर्धकांना ४७२ पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. चंपावती महोत्सव विविध स्पर्धेतून बक्षिसांची उच्चांकी संख्या गाठत सर्वोत्तम (शाळा मराठी माध्यम) संस्कार विद्यालय बीड तर (इंग्रजी माध्यम) श्री भगवान इंग्लिश स्कूल, बीड या शाळेने उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडकावर आपले नाव कोरले. तसेच बालकलाकारांचा बीड जिल्ह्यातून सर्वाधिक सहभाग करणाऱ्या संस्कार विद्यालाल बीड आणि व्हॅल्यू इंटरनॅशनल स्कूल सावरगाव या शाळेला उत्कृष्ट सहभागासाठी संसदरत्न खा. डॉक्टर श्रीकांत शिंदे करंडक देण्यात आला.

बीड शहरात सलग दहा दिवस चाललेल्या या भव्य जिल्हास्तरीय चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ▶▶ उर्वरित पान २ वर



## बालकलाकारांच्या हक्काचा चंपावती महोत्सव अखंड सुरू राहील: अनिलदादा जगताप

**महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते मा. ना. एकनाथजी शिंदे साहेब व संसदरत्न खा. डॉ. श्रीकांत शिंदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त बीडच्या रंगभूमीवर सुरू असलेला चंपावती महोत्सव कदापी बंद पडू दिला जाणार नाही, असा ठाम निर्धार शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी व्यक्त केला. बालकलाकारांच्या हक्काचा आणि कलेचे संस्कार रुजवणारा हा चंपावती महोत्सव बीड जिल्ह्याची भावना बनला असल्याचे त्यांनी सांगितले. चंपावती महोत्सव कलावंत प्रतीक कांबळे व लक्ष्मीकांत दोडके यांच्या कलेवरील प्रामाणिक प्रेमाचे प्रतीक आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.**

# आष्टीत वरिष्ठ न्यायालय, उपविभागीय बांधकाम कार्यालय, उपजिल्हा रुग्णालय, ट्रॉमा सेंटर, कृषी भवन ; मग पाटोदा–शिरूर फक्त मतदानापुरतेच का ?

**पाटोदा– शिरूरमध्ये खंबीर नेतृत्व नसल्यामुळेच विकासाच्या बाबतीत हे तालुके मागे**

**पाटोदा । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यात गेल्या काही वर्षांत विकासाची भक्कम पावले पडताना दिसत आहेत. दिवाणी वरिष्ठ स्तर न्यायालय, उपविभागीय सार्वजनिक बांधकाम कार्यालय, उपजिल्हा रुग्णालय, ट्रॉमा सेंटर तसेच कृषी भवन यांसारख्या महत्त्वाच्या शासकीय सुविधा उभारल्या गेल्याने आष्टी प्रशासकीय व आरोग्यदृष्ट्या सक्षम होत आहे.मात्र पाटोदा आणि शिरूर तालुक्यांमध्ये अशाच स्वरूपाच्या सुविधा अद्याप उपलब्ध नसल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, पाटोदा– शिरूरमध्ये खंबीर आणि ठाम पाठपुरावा करणारे स्थानिक नेतृत्व नसल्यामुळेच विकासाच्या बाबतीत हे तालुके मागे पडले आहेत. ज्याठिकाणी नेतृत्व मजबूत, तिथे विकास जलद; मग आमच्या तालुक्यांचे प्रतिनिधित्व प्रभावीपणे का झाले नाही? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.मतदानाच्या वेळी मोठमोठी आश्वासने दिली जातात; मात्र निवडणुका संपल्यानंतर मूलभूतसुविधांसाठी ठोस प्रयत्न दिसत नसल्याची भावना सर्व सामान्यांमध्ये आहे. आता पाटोदा व शिरूरमध्ये दिवाणी न्यायालय, उपजिल्हा रुग्णालय, ट्रॉमा सेंटर,सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यालय आणि कृषी भवन उभारण्यासाठी स्थानिक पातळीवर संघटित आणि खंबीर नेतृत्वाची गरज असल्याचे मत पुढे येत आहे. पाटोदा–शिरूरच्या जनतेची ही वेदना केवळ भावनिक नाही, तर समान विकासाच्या हक्कासाठीचा आवाज आहे. हा आवाज शासन आणि लोकप्रतिनिधी ऐकतील का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## खरीप २०२५ पिक विमा तात्काळ जमा करा ; शेतकऱ्यांच्या खात्यावर हेक्टरी १७ हजार रुपये द्या – तुषार पाटील

# अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान; फेब्रुवारी उजाडला तरीही शेतकरी प्रतीक्षेत

**बीड । प्रतिनिधी**



खरीप हंगाम २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. सततच्या मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी पिके पूर्णपणे नष्ट झाली, काही शेतकऱ्यांच्या जमिनी वाहून गेल्या तर काहींचे पशुधनही दगावले. या पार्श्वभूमीवर राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी प्रत्येक पात्र शेतकऱ्याला हेक्टरी १७ हजार रुपये पिक विमा देण्याची घोषणा केली होती. मात्र फेब्रुवारी महिना सुरू होऊनही अद्याप बहुतांश शेतकऱ्यांच्या खात्यावर खरीप २०२५ चा विमा जमा झालेला नाही. काही शेतकऱ्यांना मिळालेली रक्कमही अत्यंत ▶▶ उर्वरित पान २ वर

# मच्छिंद्रनाथ संजीवन समाधी सोहळ्याच्या तयारीचा आढावा आमदार सुरेश धस यांच्या अध्यक्षतेखाली पूर्वनियोजन बैठक

**आष्टी । प्रतिनिधी**

सावरगाव मायंबा येथील श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गडावर दरवर्षीप्रमाणे यंदाही मच्छिंद्रनाथ संजीवन समाधी सोहळा १८ मार्च रोजी मोठ्या भक्तिभावात साजरा होणार आहे. गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला वर्षातून एकदाच ही संजीवन समाधी भाविकांच्या दर्शनासाठी खुली केली जाते. या पवित्र सोहळ्यासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून लाखो नाथभक्त उपस्थित राहत असतात. या पार्श्वभूमीवर उत्सवाच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी सोमवारी देवस्थानचे विश्वस्त तथा आमदार सुरेश धस यांच्या अध्यक्षतेखाली पूर्वनियोजन बैठक पार पडली. या बैठकीस पोलीस, महसूल, आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, वीज वितरण, पाणीपुरवठा तसेच इतर सर्व संबंधित विभागांचे ▶▶ उर्वरित पान २ वर



# कॉमनवेल्थ मेडिकल असोसिएशन लंडन या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या फेलोशिपने हृदयरोग तज्ज्ञ डॉ.नवनाथ घुगे सन्मानित

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहरात गेल्या २१ वर्षापासून सातत्याने ३६५ दिवस रुग्णसेवेत अहोरात्रपणे कार्य करणारे आणि असंख्य रुग्णांना मरणाच्या दारातून परत आणणारे हृदयरोगतज्ञ व मधुमेहतज्ञ डॉ.नवनाथ घुगे यांच्या कार्याला झळाळी मिळाली असून लंडन येथील कॉमनवेल्थ मेडिकल असोसिएशनच्या वतीने त्याना अंतराष्ट्रीय फेलोशिप प्रदान करण्यात आली आहे. डॉ. नवनाथ घुगे यांना अंतराष्ट्रीय स्तरावरील फेलोशिप मिळवणारे ते एकमेव हृदयरोगतज्ञ आहेत. त्यांना मिळालेल्या फेलोशिपबद्दल सर्वस्तरांतुन अभिनंदन व कौतुक केले जात आहे. डॉ.नवनाथ घुगे यांनी वैद्यकीय सेवेते पाउल ठेवल्यानंतर सेवाभाव हा गुण जोपासात महानगरांमध्ये असलेली चांगल्या पॅकेजची नौकरी सोडून भवितव्य असेल ▶▶ उर्वरित पान २ वर




# तांदळा येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रम

**वारकरी संप्रदायाला मृदंग–टाळ भेट ; तिंतरवणी येथील वारकरी संस्थेतील १५० मुलांना अन्नदान**

**गेवराई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त तांदळा व तिंतरवणी येथे विविध सामाजिक व धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शिवसेनेचे गेवराई विधानसभा प्रमुख नवनाथ गवते व तांदळा गावच्या विद्यमान सरपंच सौ.सोनाली नवनाथ गवते यांच्या पुढाकारातून हा उपक्रम उत्साहात पार पडला. वाढदिवस साजरा करताना केवळ शुभेच्छांपुरते ▶ उर्वरित पान २ वर



## शिक्षण महर्षी ‘स्व. गोविंदराव (नाना) वाघ यांच्या जयंतीनिमित्त’ आंतरशालेय रंगभरण स्पर्धेचे आयोजन

# स्पर्धेत जास्तीत जास्त शाळांनी सहभागी व्हावे: श्री. गणेश वाघ

**बीड । प्रतिनिधी**



शहरातील शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ, बीड संस्थेचे संस्थापक सचिव शिक्षणमहर्षी स्व. गोविंदराव (नाना) वाघ यांच्या जयंतीच्या निमित्ताने विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी भव्य आंतरशालेय रंगभरण स्पर्धेचे आयोजन शनिवार, १४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९.०० ते १०.०० या वेळेत विविध केंद्रांवर आयोजित करण्यात आली आहे. तरी या ▶▶ उर्वरित पान २ वर

# शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा गुणवत्तेसोबतच सहशालेय उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याचे काम शाळेने केले : सागर धस



## अनिशा ग्लोबल स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा उत्साहात संपन्न

**आष्टी । प्रतिनिधी**

ग्रामीण भागात दर्जेदार शिक्षणाची संकल्पना रुजविण्याचे स्वप्न पाहणारे वडील सुरेश अण्णा धस व आई प्राजक्ता धस यांच्या दूरदृष्टीतून अनिशा ग्लोबल स्कूलची स्थापना झाली. आष्टीसारख्या ठिकाणी आधुनिक व गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी शाळा उभी करण्याचा त्यांचा निर्धार आज प्रत्यक्षात उतरलेला दिसतो. स्थापनेपासून आजपर्यंत त्यांनी स्वतः वेळ देत, प्रत्येक बाबीकडे बारकाईने लक्ष ठेवत शाळेची धुरा समर्थपणे सांभाळली.शैक्षणिक गुणवत्तेसोबतच सांस्कृतिक, क्रीडा व इतर सहशालेय उपक्रमांमध्येही विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याचे काम त्यांनी केले. प्रत्येक विद्यार्थी आणि पालकांशी सुसंवाद ठेवत विश्वासाचे नाते निर्माण करण्यात शाळा देखील यशस्वी ठरली असून.या प्रवासात सर्व शिक्षकवृंद, पालकवर्ग तसेच पिंपळेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष व सर्व संचालक यांचा मोलाचा हातभार लाभला असल्याचे मत सागर धस यांनी व्यक्त केले.ते अनिशा ग्लोबल स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलन उद्घाटन प्रसंगी बोलत होते. यावेळी संस्थेच्या मार्गदर्शका प्राजक्ताताई धस,युवा नेते जयदत्त धस, ऐश्वर्या धस, ट्रस्टी लक्ष्मण रेडेकर,थोरले महाराज,संजय मुळे उगले मॅडम, सुखलाल मुथा,शाळेचे प्राचार्य अविनाश राऊत, तपन गौडा,क्षितिजा रामदासी आदी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी,पालक,नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी हा सोहळा मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडला. विविध सांस्कृतिक ▶▶ उर्वरित पान २ वर

## थोडक्यात...

### हरवलेल्या अल्पवयीन मुलीचा शोध – बीड शहर पोलिसांची तत्पर कामगिरी

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहर पोलीस ठाणे हद्दीतील एका अल्पवयीन मुलीचा तिच्या क्लासेसमधून निघून गेल्याची तक्रार प्राप्त झाली होती. या घटनेची गंभीर दखल घेत बीड शहर पोलिसांनी तात्काळ शोध मोहीम राबवली. पोलिसांनी केलेल्या जलद व प्रभावी तपासामुळे सदर अल्पवयीन मुलीचा सुरक्षित शोध घेण्यात आला असून, तिला सुखरूपपणे तिच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आले आहे. तपासादरम्यान असे निदर्शनास आले की, काही अल्पवयीन मुली सोशल मीडियाच्या माध्यमातून अनोळखी व्यक्तींशी संपर्कात येत असून, याच माध्यमातून फूस लावून पळवून नेण्याचे प्रकार घडण्याची शक्यता आहे. पोलिसांचे आवाहन : पालकांनी आपल्या मुली कोणाच्या संपर्कात आहेत याकडे लक्ष द्यावे. मुलींशी संवाद ठेवून त्यांना विश्वासात घ्यावे. संशयास्पद चॅटिंग अथवा वर्तन आढळल्यास तात्काळ पोलिसांना माहिती द्यावी. शाळा, कॉलेज व क्लासेसच्या संचालकांनी व शिक्षकांनीही सतर्क राहावे. वेळीच माहिती दिल्यास संभाव्य अनुचित घटना टाळता येतात तसेच प्रतिबंधात्मक पोलिस कारवाई करणे शक्य होते. गैरवर्तन करणाऱ्या व समाजविघातक प्रवृत्तीच्या मुलांवर पोलीस कारवाई सुरू असून, या कामात पालक, शिक्षक व समाजाची सजगता अत्यंत आवश्यक आहे.

### आज रोजी जिल्हा नियोजन समितीची बैठक

**बीड । प्रतिनिधी**

गुरुवार दि. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन समिती सभागृहात मा. उपमुख्यमंत्री, राज्य उत्पादन शुल्क,क्रिडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक तथा बीड जिल्हयाच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली दुरदृश्य प्रणालीव्दारे बैठकीचे आयोजन केले आहे. संबधित अधिका–यांनी वेळेवर या बैठकीस उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा नियोजन समितीचे सदस्य सचिव विवेक जॉन्सन यांनी केले आहे. यानंतर लगेचच १.४५ वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्याची सन २०२६–२०२७ नियोजन आराखडा बैठक होणार आहे.

### राष्ट्रनिर्माणासाठी बहुमूल्य योगदान देणारे स्व पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुण्यतिथी निमित्त माजलगाव भाजपाच्या वतीने अभिवादन



**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगांव भारतीय जनता पार्टीच्या वतीने समर्पण दिन निमित्त व स्व. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शहर मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी केले. या प्रसंगी पंडित दीनदयालजी उपाध्याय यांच्या आठवणीला उजळा देत व त्यांनी केलेल्या कार्याची मांडणी करताना भाजपा शहर सरचिटणीस पवन मोगरेकर म्हणाले अखंड मानवतावादाची विचारसरणी आणि अंत्योदयाची संकल्पना मांडणारे पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी अविरतपणे समर्पण भावनेने केलेल्या कार्याची माहिती आपल्या मनोगतातून सांगितली. ते याप्रसंगी म्हणाले एकात्म मानव दर्शन या संकल्पनेतून त्यांनी समाज ,राष्ट्र आणि माणूस केंद्रस्थानी ठेवणारा विचार देशासमोर मांडला. राजकारण हे सत्तेसाठी नसून सेवेचे माध्यम असावे समाजातील शेवटच्या घटका चा विकास हाच खरा विकास आहे हा त्यांचा मूलमंत्र होता, त्यांचे विचार साधे जीवन आणि प्रखर राष्ट्रनिष्ठा आजही आपल्या सर्वांना प्रेरणा देतात असे सांगितले. या कार्यक्रमाला भाजपाचे ज्येष्ठ नेते ज्ञानेश्वर मेंडके , कृषी उत्पन्न बाजार समितीचे मा सभापती नितीन नाईकनवरे मा नगराध्यक्ष दीपक मुंडे भाजप नेते प्रताप रांजवण माजलगाव शहर मंडळाध्यक्ष विनायक रत्नपारखी अभय होके पाटील शरदराव कचरे ,भाजपा सरचिटणीस कैलास खुरपे,भाजपा उपाध्यक्ष बाळासाहेब क्षिररसागर , भाजपा उपाध्यक्ष कल्याण शेप , भाजपा चिटणीस विनोद लड्डा, भाजपा उपाध्यक्ष रामेश्वर चव्हाण , भाजपा विस्तारक रमेश शेंडगे, भाजपा चिटणीस संतोष जाधव , भाजपा शहर चिटणीस सुभाष कांबळे , शहरचिटणीस मनोज कोरडे भाजपा सरचिटणीस पवनजी मोगरेकर, नारायण मेंडके , युवा नेते संतोष सोळंके ,रवी गायकवाड,, ओंकार गिरी गोविंद जांगिड बबलू राऊत ,किशोर विभुते यांच्यासह शक्ती प्रमुख बूथ प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

### गाथा – ज्ञानेश्वरीच्या संगतीत भरभरून आनंद व समाधान मिळते – ह.भ.प. माधव महाराज डाके

**बीड । प्रतिनिधी**

माऊली ज्ञानोबारायांच्या ७५० व्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित ५१ ज्ञानेश्वरी ग्रंथ स्नेहभेट उपक्रम गुरुवार, दिनांक ६ फेब्रुवारी २०२६रोजी सायंकाळी ६.३० ते ७.३० या वेळेत अत्यंत भक्तीमय आणि उत्साही वातावरणात संपन्न झाला. या उपक्रमानिमित्त संपूर्ण परिसरात भक्तीचा दरवळ पसरला होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीला ज्ञानोबा–तुकोबा या नामगजरात भव्य दिंडी काढण्यात आली. घरांच्या दारात शुभ रांगोळी काढून दिव्यांची आकर्षक आरास करण्यात आली होती. फुलांची सजावट, टाळ–मृदुंगांच्या गजरात ज्ञानदेव–तुकाराम नामघोष सुरू होता. यावेळी जगद्गुरु संत तुकाराम महाराजांची गाथा ग्रंथ व ज्ञानेश्वरी ग्रंथाची भव्य मिरवणूक काढण्यात आली. त्यामुळे संपूर्ण परिसर भक्तीरसात न्हाऊन निघाला होता. याप्रसंगी ह.भ.प. माधव महाराज डाके यांनी ज्ञानेश्वरीतील निवडक ओव्यांवर अत्यंत प्रभावी आणि सोप्या शब्दांत प्रवचन केले. आपल्या प्रवचनात त्यांनी संतसंगतीचे महत्त्व विशद करताना सांगितले की, मनुष्याने आपल्या जीवनात नेहमी सज्जन व चांगल्या लोकांची संगत करावी. अशी संगत जीवन सुगंधित करते आणि आयुष्यात आनंद व समाधान निर्माण करते. मराठी संत साहित्य व वाङ्मय याविषयी बोलताना महाराज म्हणाले की, ज्ञानेश्वरी हे ७०० वर्षांपूर्वी निर्माण झालेले अद्वितीय वाङ्मय असून आजही ते तितकेच सतेज, प्रेरणादायी व मार्गदर्शक आहे. संत हे स्वार्थासाठी नव्हे तर परमार्थ कार्यासाठी, संपूर्ण जगाच्या उद्धारासाठी अवतार घेत असतात. संतांच्या संगतीने आणि त्यांनी लिहिलेल्या वा सांगितलेल्या ग्रंथांच्या वाचनामुळे माणसाच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडत असते. असे डाके महाराजांनी आपल्या प्रवचनातून स्पष्ट केले.